# गुपित खवले मांजराचं

(भारतीय खवले मांजर)



लेखक - भाऊ काटदरे
चित्रकार- आभा भागवत

सह्याद्री निसर्ग मित्र
चिपळूण

गुपित खवले मांजराचं
लेखन: भाऊ काटदरे
चित्र: आभा भागवत
© भाऊ काटदरे
6, शुभम सहनिवास,
नवीन भैरी मंदिराजवळ, चिपळूण,
जिल्हा - रत्नागिरी, 415605

प्रकाशक :
सह्याद्री निसर्ग मित्र
11, युनायटेड पार्क, मार्कंडी,
चिपळूण - 415 605,
जिल्हा - रत्नागिरी, महाराष्ट्र.
ई-मेल: sahyadricpn@gmail.com
वेबसाईट: www.snmcpn.org

पहिली आवृत्ती - फेब्रुवारी 2019
दुसरी आवृत्ती - जुलै 2019

लेआऊट व डिझाईन :
मुद्रा,383, नारायण पेठ,
पुणे - 411 030

विनामूल्य वितरणासाठी

अत्यंत दुर्लक्षित व कमी माहिती असलेल्या खवले मांजराची माहिती या पुस्तकाच्या माध्यमातून विद्यार्थी, युवक व जनसामान्यांपर्यंत पोचवण्याचा हा प्रयत्न आहे. खवले मांजर अतिशय दुर्मिळ व धोक्यात आलेल्या प्रजातींपैकी एक आहे. IUCN च्या रेड डेटा लिस्ट मध्ये धोक्यात आलेल्या प्राण्यांच्या यादीमध्ये त्याचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याचे संरक्षण, संवर्धन समाजाच्या सर्व स्तरावर व्हावे यासाठी सह्याद्री निसर्ग मित्रने प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचा एक भाग म्हणून या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येत आहे. या पुस्तकामुळे खवले मांजर संरक्षणाचा संदेश सर्वसामान्यांपर्यंत पोचेल अशी आशा आहे.

आभा भागवत यांनी चित्रांच्या माध्यमातून खवले मांजर अप्रतिम साकारले आहे.
श्री. आमोद भोईटे यांनी उत्तम लेआऊट व डिझाईन करून दिलं.
मार्गदर्शन व सहकार्याबद्दल सर्वांचे आभार!


भाऊ काटदरे
अध्यक्ष, सह्याद्री निसर्ग मित्र





''ऊठ बाळा, चल आता आपल्याला जायचे आहे ना मुंग्या खायला.''
आपल्या निमुळत्या तोंडाने एक लाडिक ढुशी मारून
आईने आपल्या तीन महिन्याच्या बाळाला उठवले.





दिवसभर आळसावल्याने त्याची झोप उडत नव्हती, पण आई परत त्याला सांगत होती, ''अरे दूध पिऊन कंटाळला आहेस ना आणि सारखे मला बाहेर फिरायला कधी नेणार विचारत असतोस ना, चल आता!''

बाळाने शेपटी लांब करत आळस दिला व म्हणाले, ''मी नाही जा, मला नाही चालायचे!''



''माझा शहाणा बाळ तो,  चल मी तुला शेपटीवरून नेते.'' असे सांगत एका संध्याकाळी आईने त्याला आपल्या शेपटीवर बसवून घराच्या बाहेर म्हणजेच सुमारे नऊ इंच रुंद व दहा फूट लांब मातीतील बिळातून बाहेर आणले.


''शेपटीवर नीट बस हो, आणि नखांनी माझे खवले घट्ट पकडून ठेव,'' असे म्हणत ती चालू लागली.



तेवढ्यात बाजूने एक  साळिंदर गेले तेव्हा बाळाने विचारले, ‘‘ते कोण गं आई?’’ आई म्हणाली, ‘ते साळिंदर.’

बाळ म्हणाले, ‘‘मग आपण कोण?’’ चालता चालता आई आपल्या बाळाला सांगू लागली, ‘‘आपण खवले मांजर पण मांजराचे व आपले काहीच नाते नाही. आपले चार भाऊबंद आफ्रिकेत आहेत तर चार आशियात राहतात.

आपण भारतातले ना म्हणून भारतीय खवले मांजर. उत्तर भारतात चिनी खवले मांजर हे दुसरे भाऊबंदही राहतात. देवाने आपल्याला खवल्यांचे उत्तम संरक्षण दिले आहे. बंदुकीच्या गोळीलासुद्धा ते सहज दाद लागू देत नाहीत, त्यामुळे निसर्गात आपण सुरक्षित राहू शकतो.’’




एवढ्यात वारुळ आले. आईने आपल्या पुढच्या पायाच्या मजबूत व टोकदार वाकड्या नखांनी पटापट वारुळ फोडले, तशी आतील वाळवी सैरावैरा पळू लागली.
तिने पटापट आपली एक फूट लांब चिकट जीभ आत बाहेर करत ती वाळवी फस्त करायला सुरुवात केली व बाळाला म्हणाली, ''बघ असे पटापट वाळवी खायला लाग, मस्त आहे.''
बाळानेही हळूहळू तसा प्रयत्न केला व हळूहळू त्यालासुद्धा जमू लागले व वाळवीसुद्धा आवडली. आज जन्मानंतर तो प्रथमच तीन महिन्याने आईच्या दुधाखेरीज इतर काही खात होता.

आई म्हणाली, ''बाळा आता तुला जन्मभर वाळवी किंवा मुंग्याच खायच्या आहेत, कारण आपल्या तोंडात इतरांसारखे दात नाहीत.

''ओंबिल नावाच्या लाल मुंग्या झाडांच्या पानांपासून घरटी करतात. त्यांना खायला मजा येते पण त्यासाठी झाडावर चढावे लागते. मी शिकवीन हं तुला पुढच्या वेळी.''





इतक्यात आईला कसला तरी वास आला. आईने आपल्या बाळाला एका फटक्यात पोटाशी ओढले व एका दगडामागे जात आपण घट्ट वेटोळे करून एका चेंडूसारखा गोळा बनली जणू एखादा दगडच.

थोड्या वेळाने वासावरून सुरक्षित अंतरावर आहे याची खात्री होताच हळूच जरा शेपटी सैल करत चाहूल घेत राहिली. प्रखर प्रकाश पुढे जाताना व कोणीतरी बोलत पुढे निघून गेलेले जाणवले.




हळूहळू आईने अंदाज घेत वेटोळे सोडवले व बाळाला बाहेर सोडत सांगितले, ''हा आत्ता आलेला वास नीट लक्षात ठेव, ती माणसे आहेत. माणूसप्राण्यामधील काही  माणसे फार वाईट असतात, ती आपली घरटी शोधतात. ती उकरून काढतात आणि आपल्याला मारून आपले मांस खातात व आपले खवले विकतात. त्यात त्यांना बक्कळ पैसे मिळतात, म्हणे ती औषधी आहेत.

''आपले खवले केराटीन पासून बनले आहेत. माणसाची नखे व केससुद्धा केराटीन पासून बनली आहेत. आपले खवले जर औषधी असतील तर माणसाची नखे सुद्धा औषधी असतील. पण माणूस तर आपली वाढलेली नखे कापून टाकून देतो. म्हणजे आपले खवले औषधी कसे असतील?



“पूर्वी  क्वचित आदिवासी लोक खाण्यासाठी आपल्याला मारत; पण त्यात पैशाची लालसा नव्हती.

“आता रात्री आपण फिरताना बॅटरीच्या प्रखर प्रकाशात आपल्याला शोधतात व मारतात. यांच्या पासून सावध राहावे लागते. अनेक वेळा आपली बिळे दोन तीन मीटर पर्यंत खणून आपल्याला मारून खातात. जगात आज सगळ्यात जास्त आपल्या भाऊबंदांची चोरटी शिकार, चोरटा आंतराष्ट्रीय व्यापार चालतो.




(अश्मयुगीन भित्तिचित्रांचे काल्पनिक चित्रण)

''खरंतर भारत सरकारने आपल्या प्रजातीला सर्वोत्तम कायद्याचे संरक्षण कवच दिले आहे, अगदी वाघाएवढे. तरीसुद्धा माणसे आपल्या जिवावर उठलेली आहेत. याच लोकांनी आपले अधिवास नष्ट केले आहेत, जंगले कमी झाली आहेत, आपल्याला फिरायला, घरे करायला जागा मिळत नाही. आपले जगणे फारच कठीण झाले आहे. कधी कोण मारील याचा भरवसा नाही, फारच काळजी घ्यायला हवी रे बाळा!

''माणसांना हे समजत नाही की आपण कोट्यवधी मुंग्या व वाळवी खाऊन त्याना मदतच करत असतो. पण ते वाळवी, मुंग्या मारायला अमाप पैसा खर्च करतात पण आपल्याला मारतात. देव करो त्यांना चांगली बुद्धी मिळो!





‘‘बाळा, पण तशी काही चांगली माणसे सुद्धा आहेत. ती निसर्ग साखळीतील आपले महत्त्व जाणून, आपले जगणे सुकर व्हावे, संख्या वाढावी यासाठी प्रयत्न करत असतात.

‘‘भारतातील महाराष्ट्र राज्यात सह्याद्री निसर्ग मित्र व इतर काही संस्था वनविभागाच्या सहकार्याने आपले रक्षण व्हावे म्हणून माणसांमध्ये जनजागृती करत आहेत.

‘‘आधुनिक ट्रॅप कॅमेरे जंगलात लावून आपले फोटो काढतात व अभ्यास करतात. गावागावांत सभा घेऊन आपले महत्त्व सांगून संरक्षण करण्यास सांगत आहेत. सर्वत्र आपल्या संरक्षणाचे बोर्ड लावताहेत, पत्रके वाटताहेत. आंतरराष्ट्रीय तस्करी थांबावी म्हणून प्रयत्न करताहेत.


‘‘मला आता आशा वाटू लागली आहे की, या चांगल्या लोकांना त्यांच्या कामात यश मिळेल व आपले राहणे सुकर होईल व आपले नातेवाईक वाढतील.



''चल बाळा, आता खूप उशीर झालाय, आवडली ना वाळवी? आता उद्या परत येऊ, उजाडायच्या आत आपण आपल्या नवीन घरात पोचू या.''

''आई नवीन घरात जायचे? म्हणजे कुठे?'' बाळाने विचारले.

''हो रे बाळा, तुला सांगते आपण एकाच घरट्यात खूप दिवस राहत नाही. कारण त्यामुळे आपल्या जिवाला धोका असतो. आपण आपल्या घराच्या आजूबाजूच्या परिसरात तीन चार घरटी आलटूनपालटून व कमी-अधिक दिवसांच्या फरकाने बदलत राहतो.



''चल, ते बघ आले आपले घर. परवाच चांगले खणून ठेवले होते. चल आत हो,
मी घराच्या तोंडावर माती ढकलून ठेवते म्हणजे आपण सुरक्षित राहू.''



भाऊ काटदरे
संस्थापक, सह्याद्री निसर्ग मित्र, चिपळूण.
सह्याद्री निसर्ग मित्रच्या माध्यमातून 1992 सालापासून चालू असलेल्या निसर्ग संवर्धन कार्यामध्ये त्यांचा विविध प्रजातींचे संरक्षणात सिंहाचा वाटा आहे. गेली दोन वर्ष ते खवले मांजर संरक्षण संवर्धनाचे काम करत आहेत. सध्या IUCN स्पेसीज सर्वायव्हल कमिशनच्या खवले मांजर तज्ज्ञ कमिटीचे सदस्य.



आभा भागवत
चित्रकार आभा भागवत यांनी लहान थोरांना सामावून घेऊन सहभाग भित्तिचित्रांची संकल्पना प्रत्यक्षात आणली. आजतागायत अशी दीडशेहूहून अधिक भित्तीचित्र भारतात विविध ठिकाणी त्यांनी केली आहेत. त्या पुण्यात शालेय मुलांना अभिव्यक्ती केंद्रित चित्रकला शिकवतात आणि मुलं व पालकांसाठी चित्र कार्यशाळा घेतात. अनेक मासिके, पुस्तके यांतील रेखाचित्र व मुखपृष्ठ केलेली आहेत. तसेच सुपरिचित नियतकालिकांतून कलाविषयक लेखन करतात.



सध्या जगात सर्वात जास्त शिकार व आंतरराष्ट्रीय चोरटा व्यापार होणारा खवलेमांजर हा प्राणी होय. आफ्रिकेत चार व आशिया खंडात चार अशा आठ प्रजाती जगभरात आढळतात. भारतात चिनी खवलेमांजर उत्तर भारतात तर भारतीय खवले मांजर उर्वरित भागात आढळते. IUCN च्या रेड डेटाबुक मध्ये भारतीय खवले मांजर धोक्यात असलेली प्रजाती म्हणून नोंदली गेली असून जगभर त्याच्या संरक्षण व संवर्धनासाठी प्रयत्न चालू आहेत.

हा प्राणी सुमारे 8 ते 20 किलो वजनाचा असतो. त्याच्या संपूर्ण शरीरावर खवल्यांचे आवरण असून हे खवले सहजासहजी बंदुकीच्या गोळीला सुद्धा दाद देत नाहीत. यामुळेच त्याला निसर्गात फारसे शत्रू नाहीत. निशाचर असणारा हा प्राणी आपल्या एक फूट जिभेच्या सहाय्याने वर्षभरात सुमारे 70 ते 80 कोटी कीडे, वाळवी, मुंग्या, डोंगळे खातो. धोका वाटल्यास शरीराचा चेंडू करून स्वतःचे संरक्षण करतो.

## सह्याद्री निसर्ग मित्र

सह्याद्री निसर्ग मित्र, चिपळूण या संस्थेची स्थापना 1992 साली झाली. गेली 27 वर्ष संस्था निसर्ग संवर्धन क्षेत्रात वनविभागाच्या सहकार्याने भरीव कामगिरी करत आहे. भारतीय पाकोळ्या, पांढऱ्या पोटाचा सागरी गरुड, गिधाडे, कासवे, खवले मांजर संरक्षण संवर्धन हे काही यशस्वी प्रकल्प होत.

जगात सध्या सगळ्यात जास्त शिकार व चोरटा व्यापार खवले मांजराचा होतो. त्याच्या संरक्षण संवर्धनाचे काम संस्था गेली तीन वर्ष करत आहे. सर्वेक्षण, जनजागृती, विद्यार्थी व युवक यांच्यासाठी विशेष जागृतीचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. तसेच ट्रॅप कॅमेरा सर्वेक्षण, अभ्यास व स्थानिकांसाठी पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करून स्थानिकांच्या सहभागातून प्रत्यक्ष संरक्षण या सर्व आघाड्यांवर विविध कार्यक्रमांतर्गत प्रयत्न चालू आहेत.

सह्याद्री निसर्ग मित्र
चिपळूण

www.snmcpn.org

ISBN 978-81-936287-2-0